फार्म हाऊस :

# रानातलं का शहरातलं!



**शहरातल्या गर्दीमध्ये, सिमेंटच्या जंगलामध्ये, गरम-डांबरी रस्त्यांमधून, वाहनांच्या आवाजात निसर्गच सापडत नाही. सतत वाढत्या गरजा, बदलती जीवनशैली, उंचावणारे राहणीमान आणि हे सर्व मिळवण्यासाठी लागणारा पैसा - जो सतत जास्तीच लागतो. ही सर्व कसरत करताना निसर्गाचा कुठलाच तुकडा शहरात रहात नाही आणि शहरी माणूस नैसर्गिक वातावरणापासून खूप दूर जातो. मग सुरू होते ती निसर्गाला घरात आणण्याची धडपड....!**

**- मानसी करंदिकर**



फार्म हाऊस - शब्दशः 'शेतघर' म्हणजे शेतातलं घर! या शब्दानेच एक दृश्य डोळ्यासमोर येते. कौलारू छपराचे, झाडीत लपलेले, उबदार घर! आजूबाजूला हिरवागार निसर्ग-वनराई, पक्ष्यांचे आवाज, पाऊस-धुके, मातीचा-झाडीचा भरून राहिलेला वास, नीरव शांतता.... एकूण काय निसर्गपूर्ण वातावरणात, शहराच्या गजबजाटापासून दूर असे स्वप्नवत घर. दोन दिवस येथे शांततेत घालवून, परत शहरातल्या प्रदुषणात येणे जीवावर येईल अशी जागा!

शहरातल्या गर्दीमध्ये, सिमेंटच्या जंगलामध्ये, गरम-डांबरी रस्त्यांमधून, वाहनांच्या आवाजात निसर्गच सापडत नाही. सतत वाढत्या गरजा, बदलती जीवनशैली, उंचावणारे राहणीमान आणि हे सर्व मिळवण्यासाठी लागणारा पैसा - जो सतत जास्तीच लागतो. ही सर्व कसरत करताना निसर्गाचा कुठलाच तुकडा शहरात रहात नाही आणि शहरी माणूस नैसर्गिक वातावरणापासून खूप दूर जातो. मग सुरू होते ती निसर्गाला घरात आणण्याची धडपड. एखादे निसर्गसुंदर चित्र किंवा गॅलरीत एक कुंडी, शक्य असल्यास छोटीशी बाग... ह्यावर निसर्गाचे अस्तित्व संपते. पण मनाला शांतता मिळत नाही. अशावेळी २ दिवस एखाद्या डोंगरात जाऊन राहण्याची इच्छा न झाल्यास नवलच. अशावेळी 'नेचर रिसॉर्ट' किंवा मग एखादी 'फार्म हाऊस प्लॉट स्कीम' मदतीला येते. अशी जमिन घेणे हे काही वर्षांपूर्वीचे खूप अवघड काम आता सोपं होऊ लागलय. 'शेतघर' हे केवळ कवि-कल्पनेतले विश्व न राहता खूप शहरवासियांकरता सत्य झाले आहे.

'शेतघर'- शहराला कंटाळलेल्या जीवांना आसरा देणारी एक चांगली कल्पना. इथे येऊन, निसर्गाच्या सानिध्यात राहण्याची, वेगळी जीवनशैली अनुभवण्याची उत्तम संधी मिळते. खरंतर इतकी सुंदर कल्पना पण वास्तव चित्र काय दिसते? शहरातून बाहेर पडणाऱ्या कुठल्याही रस्त्यावर अशा योजनांच्या पाट्यांपलिकडे काही दिसत नाही. काय नसते या जाहिरातींमध्ये! हिरवे डोंगर, धुके, वाहणारे ओढे, डोकावणारी रानफुले आणि..... त्यात टोलेजंग, सर्व सुखसोयींनीयुक्त असे चकाचक 'फार्म हाऊस'. मग वीज, पाणी, रस्ते, क्लबहाऊस या सोयींचे सुंदर फोटो या हिरवाईवर चिकटवले की चौकट पूर्ण.

शहराच्या भोवतालचे सर्व डोंगर हळूहळू या योजनांनी आणि टोलेजंग महालांनी व्यापू लागलेत. कुठे गेली ती निर्भय हरणे, मोकळी हवा, नीरव शांतता आणि स्फटिकासारखे ओढे? या सर्वांच्या जवळ जाण्याच्या नादात तेच हरवून गेले की काय! आपल्याला असलेली निसर्गाची आंतरिक ओढ त्या निसर्गाच्याच विरोधात उठली की काय? का निसर्गाच्या जवळ जाण्याचाही हव्यास केला आणि निसर्गाचीच नासाडी केली?

वरवर पाह्यले तर वाटेल की असे कसे होईल. मोठे घर बांधले म्हणून काय झाले. त्याभोवती खूप सारी झाडे लावून, हिरवळ लावून, हिरवाई उत्पन्न करून डोंगर परत हिरवे करता येतीलच! पण इथे प्रश्न फक्त हिरवाई दिसण्याचा नाहीये तर त्यापुढे जाऊन विचार व्हायला हवाय.

मुळातच शहरातले तणावाचे जीवन, निसर्ग विरहीत प्रदेश आणि प्रदूषण यापासून मुक्तता म्हणून या शेत-घरांची लोकप्रियता आहे. पण हे घर जर शहरातल्याच सुखसोयींनी भरलेले असेल, तिथेही टी. व्ही. चाच आवाज असेल तर या सर्व सुखसोयी पुरवण्यात त्याचे नैसर्गिक रूपच हरवून जाते आणि हे सर्व आठवड्यातल्या किंवा महिन्यातल्या फक्त २ दिवसांसाठीच.

परत फार्म हाऊस एकेकट्यांची नसतात, तर ती एकत्रित स्किम असते. गावातील लोकांकडून जमिनी विकत घेऊन विकसक त्यांची आखणी करतात, प्रत्येक जागेच्या तुकड्याला रस्ता, वीज, पाणी पुरवठ्याची योजना आखतात आणि मग बऱ्याच घरांची सोसायटीच तयार होते.

फार्महाऊसचा प्रकल्प नैसर्गिक वातावरणातच असू शकतो. शहरापासून दूर डोंगरात, जिथून उत्तर दृश्य दिसतील अशा ठिकाणीच हे शक्य होते. म्हणजे पुण्या-मुंबईबाबत बोलायचे झाले तर सह्याद्री अथवा कोकणात ही योजना असते. हे भाग तिथल्या जैववैविध्याकरता, भरपूर पावसाकरता आणि नाजूक परिसंस्थेकरता प्रसिद्ध आहेत. पण इथे प्रश्न फक्त सह्याद्रीचा नाही. मोठ्या प्रमाणावरील बदलांमुळे होणाऱ्या निसर्गाच्या नुकसानीचा आहे. शेतीयोग्य जमीन, हिरवे डोंगर उतार, स्वच्छ ओढे यांचे रूपांतर सिमेंट, डांबर यांनी आच्छादलेल्या भागांमध्ये होत आहे. निसर्गाला, मातीला बनायला हजारो वर्ष लागतात, पण त्याचे खराब दिसणाऱ्या इमारती-बंगल्यामध्ये रूपांतर फार झटकन होते. या बदलाला सामोरे जायला, त्या प्रमाणे बदलायला निसर्गाला वेळ मिळत नाही आणि हळूहळू तिथली माती, झाडे, प्राणी, दुर्मिळ होऊन नष्ट होऊ लागतात. हे सगळे लक्षात घेता विकास निसर्ग आणि माणूस यांना योग्य की अयोग्य याचे उत्तर अर्थातच अनियंत्रित विकासामुळे निसर्गाचा नाश होणे अयोग्य आहे हेच येते. असे हे फार्म हाऊसचे प्रकल्प नक्की नुकसान काय करतात हे जाणून घेणे महत्वाचे ठरेल. अशा प्रकल्पासाठी होणाऱ्या 'डेव्हलपमेंट' मुळे डोंगरांचे उतार बदलतात, झाडे तोडली जातात, स्फोटांमुळे पाण्याचे स्त्रोत बदलतात, ओढे तर नाहीसेच केले जातात. या सर्वांचा एकत्रित परिणाम नैसर्गिक साधनसंपत्ती व वन्यजीवनावर होतो आणि शहरी जीवनशैली फार्महाऊसवर नेण्याच्या अट्टाहासाने थोड्याच काळात तिथे एक सोसायटी-उपशहर तयार होते व फार्महाऊसचा मूळ विचार नाहीसा होतो.

जागा घेतल्यावर सर्वप्रथम तेथील सर्व झाडोरा 'रानटी', 'काटेरी' या नावाखाली तोडला जातो. यात दुर्मिळ ऑर्कीड असते. एखादे मोठे झाडही असते. यानंतर मोठी यंत्र वापरून उतार सपाट केले जातात, ओढे बुजवतात. मग रस्त्यांकरता खूप मोठ्या प्रमाणावर खोदाई केली जाते. यापुढे पाणी, वीज पोचवण्यासाठी यंत्रणा, मग पंचतारांकित क्लब हाऊस उभारले जाते. हे सर्व झाले की सुरू होते घर बांधण्याची प्रक्रिया. सिमेंट, लोखंड, वीटा अशा बांधकाम सामानाने बांधलेले टोलेजंग घर येथे उभे राहते. काही घरांच्या कुंपणाकरताच इतके सामान वापरतात की त्यातून २-३ छोटी घरे होतील. या सर्व खटाटोपात भोवतालचा परिसर उजाड झालेला असतो. मग हिरवाई उत्पन्न करण्याचे काम सुरू होते. यात अग्रेसर असते ती शेकडो फुटांवर पसरलेली हिरवळ. जिला वर्षभर आणि आयुष्यभर रोज पाणी द्यावे लागते. भोवती सुंदर फुलांचे ताटवे, आंबा-चिक्कूची झाडे, सुरू-सुबाभूळ-निलगिरी-गुलमोहराचे पट्टे तयार होतात आणि मग थोडी झाडी, हिरवाई मिळाल्यामुळे आधी पळून गेलेले पण शहरांमध्येही माणसाच्या सान्निध्यात राहू शकणारे शिंजीर, बुलबुल, मैना, कावळे हे पक्षी परतू लागतात. माणसाला बुजणारे, मुळचे लावऱ्या, भेकर, गरूड, रानडुक्कर नाहीसे होतात. साप, विंचू चुकून अवतरतात आणि मारले जातात. त्यांच्याच रानात मूळचे प्राणी परके होतात. प्राण्यांना तारेचे, दगडाचे कुंपण आडवे येते. साफसफाईसाठी गवत काढून टाकल्याने त्याच्या बियांवर येणारे, त्यांची पाती घरट्याकरता वापरणारे, त्यावरील किडे खाणारे पक्षी-प्राणी निघून जातात. आधी करवंदीच्या जाळीत घरटं करणारा पक्षी तिथे कण्हेरीचे झुडूप पाहून निघून जातो. पूर्वी असलेली झुडुपांची दाटी, गवत, अनेक वर्षायु वनस्पती गायब झाल्याने त्यावर मधासाठी, आडोशासाठी, घरट्यासाठी, पाना-फुलांकरता, फळे खायला अवलंबून असणारे किडे, मधमाशा, फुलपाखरे, अळ्या, सरडे, साप हळूहळू दुसरीकडे जातात किंवा नष्ट होतात. आता असे प्रकल्प सर्वत्र होऊ लागल्याने दुसऱ्या जागाही उरल्या नाहीत.

एकूण काय तर वनस्पती आणि प्राणी दोन्हीकरता अशा फार्महाऊस प्रकल्पात जागाच नसते. त्यांच्याच राज्यात येऊन अखेर तेच हद्दपार! कधीही असेही दिसते की झाडे लावल्यावर, हिरवे झाल्यावर पक्षी वाढतात. पण ते कुठले हे सुद्धा महत्वाचे असते. रानव्यामध्ये दिसणारे श्रृंगी घुबड किंवा सर्पगरूड यासारखे वैशिष्ट्यपूर्ण गरजा असणारे पक्षी घरे, रात्रीचे दिवे आल्याने पळून जाऊ शकतात.

या पलिकडे, पर्यावरणावर संसाधने आणि उर्जेच्या वापरामुळे पडणारा ताण तर मोजता न येण्याइतका मोठा आहे.

आणि इतकी सगळी उठाठेव करून, सुंदर घर आणि बाग करून माणसे त्यात फक्त एखादा दिवस राहतात. म्हणजेच त्या तयार केलेल्या वास्तूचा, वापरलेल्या संसाधनांचा, निसर्गाचा पूर्ण वापरही होत नाही. या आठवड्यातील एका दिवसाकरता आपण निसर्गाचे खूप नुकसान करतो..... प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे. यातून काहीतरी मार्ग काढायलाच हवा!